# केवड्याचे  रान

केवड्याचे रान सारे आज येथे लुप्त झाले
वेदनांचे गंध तेव्हा तेथलेही गुप्त झाले
भाजतो वैशाख राना निष्पर्ण झाडेच तेव्हा
वाहणे का या नदीचे नेहमीचे सुप्त झाले
त्यांनी काढता ती श्वापदेही मौन झाली
जंगलांचे कान तेही पारध्यांनी युक्त झाले
मंगळाचे या प्रभाती पूर्वरंगी रंगणारे
सूर्य येता अंबरी या हे उषेचे सूक्त झाले
सागराची गाज तेव्हा जाहली थोडी मुकी का?
भारल्या भरतीस तेव्हा हे किनारे भुक्त झाले

प्रकाश रामचंद्र क्षीरसागर, गोवा